# ४५ वा
# वार्षिक अहवाल
# २०१५ - २०१६

# पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

# अनुक्रमणिका

संचालकांचा अहवाल ........................................ ४

लेखा परिक्षकांचा अहवाल ........................................९

ताळेबंद ........................................१५

नफा तोटा पत्रक ........................................१६

टिपण्या (१ ते ३५) ........................................१९

महालेखा परिक्षक यांचे भाष्य ........................................६३-६४

इंग्रजी अहवाल ........................................ ३४

WMDC/CS/MD/45th AGM/2016/1692 20th September, 2016

# NOTICE

Notice is here by given that the 45th Annual General Meeting of Western Maharashtra Development Corporation Ltd. will be held on Friday the 30th September 2016 at 12.00 P.M. at the Registered Office of the Corporation situated at 2nd floor, Kubera Chambers, Opp. Sancheti Hospital, Shivajinagar, Pune - 411005 to transact the following business :

**Ordinary business:**

1. To receive, consider and adopt the Directors' Report together with Profit & Loss Account for the year ended 31st March 2016 and the Balance Sheet as on 31/3/16 of the Corporation along with Statutory Auditor's Report and Comments received there on from the comptroller & Auditor General of India, there on.

2. To appoint Director in place of Mr. Vikramkumar IAS Chief Executive Officer MIDC, Mumbai Whoe retires by rotation and being eligible offers himself for reappointment in pursuance of Article 110 (2) of the Article of Association of the Corporation.

3. To appoint Director in place of Mr. S. S. Degaonkar, Dy. Secretary, IE & LD, Mantralaya, Mumbai - 32, Who retires by rotation and being eligible offers himself for reappointment in pursuance of Article 110 (2) of the Articles of Association of the Corporation.

4. To declare dividend to share holders.

**(S. S. Survase)**
**Managing Director**

By Order of the Board
For Western Maharashtra Development Corporation Ltd.,

**Note :**

A member entitled to attend and vote at the meeting is also entitled to appoint a Proxy to attend and vote instead of himself and the Proxy need not be a Member.

---

# PROXY FORM

I/We the undersigned Equity Shareholder/s of Western Maharashtra Development Corporation Ltd. hereby appoint Mr./Mrs. ........................................................................ as my/our Proxy to act for me/us at the 45th Annual General Meeting of the Equity Shareholders to be held at 2nd floor, Kubera Chambers, Opp. Sancheti Hospital, Shivajinagar, Pune - 411005 on Friday the 30th September 2016 at 12.00 p.m. for the purpose of considering and if thought fit approving with or without modifications, and at such meeting and in adjournment thereafter to vote for me/us and in my/our name.

Signature/Date

Name
(SHAREHOLDER)

Address

The Proxy duly completed must be deposited at the Registered Office of the Company not less than 48 hours before the time of holding the meeting.

# पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे

## संचालक मंडळ २०१५-२०१६

| | | |
|---|---|---|
| व्यवस्थापकीयसंचालक | श्री. एन. के. पोयाम (आयएएस) | दि. १०.०६.२०१५ पर्यंत |
| व्यवस्थापकीयसंचालक | श्री. एस्. एस्. सुरवसे | दि. ११.०६.२०१५ पासून |
| संचालक | श्रीमती व्ही. जी. पंडित | दि. ०६.११.२०१५ पर्यंत |
| संचालक | श्री. विक्रम कुमार (आयएएस) | दि. ०६.११.२०१५ पासून |
| संचालक | श्री. संजय देगावकर | दि. १८.०६.२०१४ पासून |
| संचालक | श्री. के. जी. डेकाटे | दि. ०६.११.२०१५ पासून |
| संचालक | श्रीमती व्ही. बी. सोने आगाशे | दि. ०५.०१.२०१६ पर्यंत |
| संचालक | श्री. ए. एन. मोरे | दि. २५.०२.२०१६ पासून |

❖ ❖ ❖ ❖ ❖

| | |
|---|---|
| लेखा परिक्षण | पी. एन. फडके ॲण्ड कं.<br>चार्टर्ड अकौटंटस् |
| अंतर्गत लेखापरिक्षक | एम. एम. घारपुरे ॲण्ड असोसिएट्स<br>चार्टर्ड अकौटंटस् |
| सी. आय. नंबर | १४८९६ – १९७० – ७१ |


### ✻ नोंदणीकृत कार्यालय ✻

कुबेरा चेंबर्स, २ रा मजला,
डॉ. राजेंद्र प्रसाद मार्ग, संचेती हॉस्पिटल समोर,
शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५
दूरध्वनी : (०२०) २५५३३३२४/२५/२६
Email : mahawestern@gmail.com

## संचालकांचा अहवाल

प्रति,

मान्यवरसभासद,

आपल्या व्यवसायाचा ४५ वा वार्षिक अहवाल आणि दि. ३१ मार्च, २०१६ अखेर लेखा परिक्षकांनी तपासणी केलेल्या हिशोबाचा समग्र वृत्तांतआपल्यासमोरसादर करण्यास सर्व संचालकांना आनंद होत आहे.

१) **आर्थिक निष्कर्ष :**

महामंडळाची २०१६ सालची आर्थिक उलाढाल व मागील वर्षाची आकडेवारी पुढीलप्रमाणे दिली आहे.

### २०१६ या संपलेल्या आर्थिक वर्षाचा तपशील.

रुपये-लाखात

| तपशील | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५ अखेर |
|---|---|---|
| एकूण विक्री | १८५.५९ | ८३.५७ |
| अधिक इतर उत्पन्न | २४२९.७७ | १२३७.९९ |
| **एकूण उत्पन्न** | **२६१५.२६** | **१३२१.५६** |
| एकूण खर्च | ५७३.८२ | ५७८.७९ |
| मुदतपूर्व बाबी | (०.०६) | ३.०२ |
| **व्याजव कर या पूर्वीचा नफा** | **२०४१.५०** | **७३९.७५** |
| वजा सध्याचाप्राप्तीकर | ४३.११ | ०० |
| वजा मागील वर्षातील प्राप्तीकर तडजोड | ००.०० | ००.०० |
| अधिक विलंबीत कर | ०.५९ | १.१७ |
| **कर पश्चात निव्वळ नफा** | **१९९८.९८** | **७४०.९२** |
| लाभांश (तात्पुरता असेल तर आणि अंतीम) | ००.०० | ००.०० |
| लाभांश व कर या नंतरचा निव्वळ नफा | ००.०० | ००.०० |
| राखीव निधित वर्ग केलेली जमा | १९९८.९८ | ७४०.९२ |
| ताळेबंद पत्रकात वर्ग केलेली जमा | १९९८.९८ | ७४०.९२ |
| प्रती समभागावरील मिळकत (मूलभूत) | ६५३.७६ | २४२.३२ |
| प्रती समभागावरील मिळकत (मूलभूत) | ६५३.७६ | २४२.३२ |
| प्रती समभागावरील मिळकत (मूलभूत) | ६५३.७६ | २४२.३२ |
| प्रती समभागावरील मिळकत (सौम्य) | ६५३.७६ | २४२.३२ |

२) **लाभांश**

संचालक मंडळाच्या म्हणण्यानुसार मार्च २०१६ या आर्थिक वर्षात व्यवसायास फायदा झालेला असून भागधारकांना १० टक्के लाभांश देण्यास मंडळाने संमती दिली आहे.

## ३) व्यवसायातीलआर्थिक व्यवहाराचेपुनरावलोकन व भविष्यातील अपेक्षा :

विविध शासकीय योजनांतर्गत दिलेल्याकर्जांची वसूली करण्याचे कार्य महामंडळाने सातत्याने चालू ठेवले आहे. एक रकमी कर्ज वसूली व दंडव्याज माफी योजना राबविल्याने कर्ज वसुलीला गती मिळाली आणि विविध योजनांतर्गत कर्ज वसुली करीता याचा उपयोग झाला.

महामंडळाने दिवाणी न्यायालयात दावे (दरखास्त) ही दाखल केले आहेत आणि त्या संबंधीचे निकाल महामंडळाच्या बाजूने लागले आहेत.

महामंडळाने बिगर न्यायिक दस्तांचे फ्रँकिंग करण्याच्या सेवेवर लक्ष केंद्रित केले आहे. सरकारने जरी फ्रँकिंग सुविधेवरील कमिशनचा दर कमी केलेला असला तरी महामंडळाने फ्रँकिंग दस्त विक्रीचे प्रमाण वाढविल्याने, कमी झालेल्या कमिशनदराचा महामंडळाच्या उत्पन्नामध्ये काही फरक पडलेला नाही.

मुख्य कार्यालयामधील व्यवसाय वाढविण्यासाठी नवीन परवाना घेण्याऐवजी हडपसर मध्ये आणि पिंपरी कोथरूड यासारख्या अन्य ठिकाणी विस्तारीत शाखा सुरु करण्यासंबंधी योजना विचाराधीन आहे. या सबंधी अवश्यक ते प्रयत्न केले जात आहेत.

सिंहावलोकन करता, चालू वर्षात महामंडळाचे एकूण रु. ८.३० करोड इतक्या रकमेचे दस्त फ्रँकिंग झाले आणि त्यावरील कमिशन व सर्व्हिसचार्जेस असे एकूण रु. २३.९९ लाख इतके उत्पन्न महामंडळास मिळाले आहे.

महामंडळाकडील मनुष्यबळाचा सुयोग्य वापर करण्यासाठी महामंडळाने फ्रँकिंग सेवे व्यतिरिक्त पॅनकार्ड, प्रयोगशाळा (लॅबॉरेटरी) इत्यादी अन्यसुविधा पुरविणेही सुरु केले आहे.

महामंडळाने युटीआयच्या सहकार्याने पॅनकार्ड देण्याची सुविधा सुरु केली आहे आणि महामंडळाला सेवा शुल्क (सर्व्हिसचार्जेस) द्वारे रु. १.०५ लाख मिळाले आहेत. मोलॅसेस (मळी) साठी तपासणी केंद्र सुरु केले गेले आहे. आणि तपासणी फी द्वारा रु. ५.६७ लाख मिळाले आहेत. काही कालावधीनंतर महामंडळ या योजनांचा आढावा घेऊन त्या फायदेशीर करण्याकरिता आवश्यक वाटल्यास त्यात बदल किंवा सुधारणा करेल अन्यथा त्या बंद करेल.

## संयुक्त क्षेत्रातील प्रकल्प/अनुदाने/भांडवलभागिदारी :

महाराष्ट्र स्कूटर्स लिमिटेड –

मे. महाराष्ट्र स्कूटर्स लि. यांच्या समभागांच्या मूल्यांकनाविषयी मे. बजाज ऑटो लि. यांचा कंपनी कायदा १९५६ च्या कलम १११ अे अन्वये केलेला दावा मा. उच्च न्यायालय यांनी मान्य केला आहे आणि त्या विरोधात प. म. वि. म. ने दाखल केलेला दावा निकालात काढला आहे. संचालक मंडळाने त्याबाबत कायदे विषयक तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाच्या खात्याची परवानगी घेऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या डिव्हिजन बेंचचा हुकूम बाजूस ठेवण्याविषयी सर्वोच्च न्यायालयात विनंती अर्ज (SLP) दाखल केला आहे, आणि सध्या मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये याबाबत कामकाज प्रक्रिया सुरु आहे.

## शासकीय योजना :

शासकीय आदेशांच्या अनुषंगाने सामुहिक प्रोत्साहन व सुशिक्षित बेरोजगार योजनांतर्गत दिलेल्या कर्जांच्या वसुलीचे कार्य महामंडळ करीत आहे.

सुशिक्षित बेकार योजने अंतर्गत एकूण रु. १००.३७ लाख इतकी आणि विविध प्रोत्साहन योजनांतर्गत रु. १७०.५९ लाख इतकी वसुली केली आहे.

ज्या उद्योजकांनी कर्जाचा भरणा करण्यास नकार दर्शविला आहे त्यांच्याविरुद्ध महामंडळाने दिवाणी व फौजदारी कायद्याच्या कलमांनुसार तसेस आर. आर. सी अन्वये कारवाई सुरु केली आहे.

४. आर्थिक वर्षाच्या शेवटी आणि या तारखेच्या अभिप्रायापर्यंत हे निवेदन संबंधित आहे, या काळात साहित्य सामग्रीतील बदल आणि जर कोणती अंगीभूत जबाबदारी कंपनीच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणारी उद्‌भवली असेल.

या आर्थिक वर्षाच्या शेवटी आणि या तारखेच्या अभिप्रायापर्यंत मंडळाच्या साहित्यसामग्रीत आणि अंगीभूत जबाबदारी यामध्ये मंडळाच्या आर्थिक स्थितीवर कोणताही परिणाम झालेला नाही.

५. ऊर्जा बचत, तांत्रिक सहभाग व परकीय चलनाची मिळकत व तिचा विनियोग :

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३० (एम्) महामंडळास लागू होत नाही. या वर्ष अखेरी पाहता परकीय चलनाची मिळकत वा तिचा विनियोग झालेला नाही.

६. महामंडळाच्या जोखिम व्यवस्थापन धोरणाचा विकास व अंमलबजावणी या संबंधी निवेदन :

महामंडळाच्या अस्तित्वास जोखीम भेडसावण्यायोग्य अनुकूल वातावरण अगदी कमीत कमी प्रमाणात असल्याने महामंडळाकडे कोणतेही जोखीम व्यवस्था धोरण नाही.

७. महामंडळाकडून त्यांच्या सामुदायिक सामाजिक जबाबदारी व पुढाकार विकसीत धोरण व अंमलबजावणीचा तपशील.

या वर्षात महामंडळाने सामुदायिक सामजिक जबाबदारी बाबत पुढाकार विकसीत धोरण तयार केले असून त्याची अंमलबजावणी केली आहे. संचालक मंडळाकडून याबाबत निधीची नोंद घेण्यात आली असून निधी उभारण्याकरिता व त्याच्या वापराकरीता सामुदायिक सामाजिक जबाबदारी निधी समिती स्थापन करण्याचे ठरविण्यात आले आहे. संचालक मंडळाने सूचित केलेले आहे की, आर्थिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये महामंडळाने माळीण येथे झालेल्या दुर्घटनेकरिता मुख्यमंत्री मदत निधीला ०.२९ लाख रुपयांची देणगी दिली आहे.

८. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८६ अन्वये कर्ज, जामिन किंवा गुंतवणूक केल्याचा तपशील.

कलम १८६ अन्वये केलेल्या कर्ज, जामिन किंवा गुंतवणुकीचा तपशील परिशिष्ट अे मध्ये दर्शविलेला असून अहवाला सोबत जोडलेला आहे.

९. संबंधीत पक्षकारांबरोबर करारनामे किंवा तजवीज केल्याचा तपशील

कंपनी कायदा २०१३, कलम १८८ अंतर्गत केलेल्या व्याखे अनुसार संबंधीत पक्षकारांबरोबर करार किंवा तजवीज केलेली नाही.

१०. लेखापरिक्षक आणि व्यावसाईक कंपनी सचिव यांचे द्वारा केले गेलेले योग्यता, निर्बंध किंवा प्रतीकूल शेरे किंवा नाकबुली यावरील स्पष्टीकरण किंवा भाष्य :

लेखा परिक्षण मध्ये उल्लेखिलेल्या आर्थिक निवेदनांवरील टीपा ह्या स्व स्पष्टीकरणात्मक आहेत आणि यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही. लेखापरिक्षणामध्ये योग्यता, मर्यादा किंवा निर्बंध वा प्रतिकूल शेरे यांचा समावेश नाही.

११. संचालकांची नेमणूक, वेतन किंवा मोबदला आणि बडतर्फी या बाबत मंडळाचे धोरण.

कलम १७८(१) च्या तरतुदीनुसार मूळ नियमासंबंधित नेमणूक आणि मोबदला समिती ह्या मंडळास लागू नाही आणि म्हणून महामंडळाने संचालकांची नेमणूक, व्यवस्थापन मोबदला म्हणून दिलेली रकम, संचालकांची योग्यता, सकारात्मक वागणूक, संचालकांचे स्वातंत्र्य आणि संबंधित गोष्टी कंपनी कायदा २०१३, कलम १७८(३) च्या अटिंनुसार कोणतेही धोरण प्रयोजन केलेले नाही.

१२. वार्षिक परतावा :

कंपनी कायदा (व्यवस्थापन आणि प्रशासन) २०१४, कलम ९२, नियम १२ मधील तरतुदींना अनुसरून वार्षिक परताव्याचा सारांश परिशिष्ट बी मध्ये देण्यात आला आहे व या अहवालास जोडण्यात आला आहे.

१३. वर्षभरात अंमलात आणलेल्यासंचालक मंडळाच्यासभांचा आकडा.

२०१६ या वर्षात संचालक मंडळाच्या ५ सभा (बैठका) २१/५/१५, १७/८/१५, २९/९/१५, १/१/२०१६ आणि २९/२/१६ या प्रकारे झाल्या. झालेल्या कामकाजाचे योग्यत-हेने, सह्यनिशी इतिवृत्तांत नोंदवलेले आहे. मंडळाने कोणताही ठराव मंजूर केलेला नाही.

१४. सहाकारी कंपनी, उपकंपनी आणि भागीदारी कंपनी,

महामंडळाची कोणतीही सहकारी कं., उपकंपनी किंवा भागीदारी कंपनी नाही.

१५. ठेवी

संबंधित वर्षामध्येमहामंडळाने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्वीकारल्या नाहीत किंवा मागविल्या नाहीत. महामंडळाकडे वर्षभरात हक न सांगितलेल्याकिंवा परत न केलेल्याठेवी नाहीत.

१६. संचालक

संबंधित वर्षात आपल्यासंचालक मंडळात श्री. एन.के. पोयाम (भा.प्र.से.) व्यवस्थापकीयसंचालक (१०.६.२०१५ पर्यंत), श्री. एस.एस. सुरवसे – व्यवस्थापकीय संचालक (११–६–१५ पासून) आणि श्रीमती व्ही. बी. सोने–आगाशे – उपसंचालक – डी. आय. सी. औरंगाबाद (५–१–१६ पर्यंत), श्रीमती व्ही.जी. पंडित – कक्ष अधिकारी (आय इ एल डी) (६–११–१५ पर्यंत), श्री. विक्रमकुमार (भा.प्र.से.), जॉ. चीफ सेक्रेटरी, एमआयडीसी, मुंबई (६–११–१५ पासून), श्री. एस. एस. देगावकर डेप्यु. सेक्रेटरी उद्योग, उर्जा, श्रमखाते (१८–६–१४ पासून) श्री. के. जी. देकाटे, जनरल मॅनेजर (डीआयसी पुणे) (६/११/१५ पासून), श्री. ए. एन. मोरे (२५/२/१६ पासून) संचालक यांचा समावेश आहे.

कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनच्या कलम ११० (२) च्या तरतुदीनुसार संचालक श्री. आर. के. निखारगे, संचालक श्री. एस.एस. सुरवसे क्रमाक्रमाने निवृत्तीहोतील आणि संचालक होण्यासाठी पुनर्नेमणुकीस पात्र असतील.

१७. स्वायत्तासंचालकांचे निवेदन

कंपनी कायदा कलम १४९ (४) व नियम (४) (कंपनी संचालकांची नेमणूक व पात्रता) २०१४ नुसार मंडळास स्वतंत्र संचालक नेमण्याची गरज नव्हती, म्हणून कोणतेही जाहीर निवेदन दिलेले नाही.

१८. वैधानिकलेखा परिक्षक

भारताचे नियंत्रक महालेखाकार यांच्या मार्गदर्शनानुसार महामंडळाचे लेखा परिक्षक मे. पाटणकर आणि असोसिएशटस् (रजि. नं. १०७८९० डब्ल्यू.) यांची आर्थिक वर्ष २०१५–१६ करिता वैधानिक लेखा परिक्षक म्हणून नेमणूक केली होती, आणि पुनर्नेमणुकीस ते पात्र आहेत. मंडळाने त्यांची नेमणूक व पुढे काम करण्याची तयारी ह्या गोष्टी विचारात घेतल्या आहेत.

१९. धोका व्यवस्थापनधोरण

महामंडळाच्या अस्तित्वास धोकादायक वातावरण कमीत कमी असल्यानेमहामंडळाकडे कोणतेही धोका व्यवस्थापनधोरण नाही.

२०. लेखा परिक्षण समितीच्यारचनेबाबत प्रकटीकरण आणि तिच्यादक्षता यंत्रणेविषयी तरतूद

कंपनी कायदा २०१३ (कलम १७७, भाग ६ व ७) च्या तरतुदी नुसार कंपनीचे नियम (संचालकांचे अधिकार व सभा) महामंडळास लागू नाही.

२१. समभाग

अ) संबंधित वर्षात महामंडळाने त्यांचे रोखे पुनर्खरेदी केलेली नाहीत.

ब) संबंधित वर्षात महामंडळाने कोणतेही न्यायहक समभाग वितरीत केलेले नाहीत.

क) संबंधित वर्षात महामंडळाने कोणतेही बक्षीस रुपी (बोनस) समभाग वितरीत केलेले नाहीत.

ड) कर्मचा-यांकरिता महामंडळाच्या समभाग विकल्पयोजनेची कोणतीही तरतूद महामंडळाने केलेली नाही.

२२. <u>कंपनी कायदा २०१३ कलम १३४ (५) नुसार मंडळ आपल याजबाबदारीबाबत निवेदन देत आहे.</u>

अ) वार्षिक हिशोबाची तयारी करताना योग यस्पष्टीकरणासह लागू होणाऱ्या हिशोबाच्या दर्जाचा विचार केलेला आहे.

ब) वर्षभरातील नफा आणि तोटा तसेच व यवहाराचेनिवेदनाचे सत्य व योग यअसे चित्रण करताना दू रदर्शी माफक धोरण अशी पद्धत हिशोब सादर करताना संचालकांनी निवडली आहे.

क) मालमत्तेचीसुरक्षितता तसेच भ्रष्टाचार व गै रव यवहाराांचे नियंत्रण करताना, पुरेशा हिशोब नोंदणीसाठी संचालकांनी योग यव पूर्ण काळजी घेतलेली आहे.

ड) एक चालू असलेला व यवसाययादृष्टीने संचालकांनी वार्षिक हिशोब तयार केले आहेत.

इ) लागू होणारे कायदे आणि कामकाज कार्यक्षमतेने चालण्याचे दृष्टीने संचालकांनी कार्यपद्धती अंमलात आणली आहे.

२३. <u>आभार प्रदर्शन</u>

संबंधित वर्षाबाबत, तुमचे संचालक बँकर्स, व यावसायिक सहकारी, सल्लागार व विविध सरकारी अधिकारी मंडळीनी महामंडळाच्या कार्यात दिलेल यासततच्या आधाराचे मनापासून आभार व यक्त करीत आहेत.

तुमचे संचालक सभभागधारकांचे सुध दामहामंडळाला दिलेल या आधाराचे व ठेवलेल या विश्वासाबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार मानत आहेत.

पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (म.) यांच्या
संचालक मंडळाच्या आज्ञेवरून,

अध यक्ष
(DIN – ०१५४१५८९)

स्थळ : पुणे
दिनांक : ३ सप्टेंबर २०१६

मे. पी. एन. फडके आणि कं.
चार्टर्ड अकौंटन्टस
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्ल्यू.

१०३, मेघ अपार्टमेंटस, स. नं. ३९/३३,
आयुर्वेद रसशाळेजवळ, ऑफ कर्वे रोड,
पुणे - ४११ ००४.
ईमेल : pnphadkeca@gmail.com

# लेखा परिक्षकांचा स्वतंत्र अहवाल

## प्रती - सदस्य, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (म.) पुणे

### आर्थिक बाबींच्या नोंदीचा अहवाल :-

पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्या. पुणे यांच्या सोबत जोडलेल्या आर्थिक बाबींच्या नोंदी ज्यामध्ये दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, रोखीचा ओघ टिपण्या आणि महत्वाची लेखाधोरणे व स्पष्टीकरणात्मक माहिती आम्ही तपासली.

### आर्थिक बाबींच्या नोंदी बाबत व्यवस्थापनाची जबाबदारी -

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३४(५) मध्ये दिलेल्या बाबींनुसार मंडळाची आर्थिक स्थिती, आर्थिक कामगिरी आणि रोखीचा ओघ खऱ्या व योग्य पध्दतीने दर्शविला जाईल अशा रितीने तसेच सामान्यतः भारतात स्विकारलेले लेख्यांचे मूलतत्व-ज्यामध्ये कंपनी (लेखे) नियम २०१४, कलम १३३ च्या नियम ७ मध्ये नमूद लेखे-मानक यांना अनुसरून आर्थिक बाबींच्या नोंदीचा अहवाल बनविण्यास मंडळाचे संचालक मंडळ जबाबदार आहे. या शिवाय या जबाबदारीमध्ये अंतर्गत कायद्यातील तरतुदी नुसार लेख्यांच्या पुरेशा नोंदी ठेवणे, मंडळाच्या मालमत्तेचे संरक्षणाकरिता फसवणूक व इतर गैरव्यवहार शोधणे व थांबविणे, योग्य ते लेखे धोरण निवडणे व लागू करणे, निर्णय घेणे, माफक आणि धोरणी अंदाज करणे, अंतर्गत आर्थिक अधिकार मर्यादेत ठेवणे व अंमलबजावणी करणे, हिशोबांच्या नोंदींची बिनचूकपणा व पूर्णता यांची खात्री करणे, जे परिणामकारकरित्या कृतीत येत होते, याच्याशी निगडीत चुका किंवा लबाडी नसलेली व खऱ्या व योग्य पध्दतीने तयार व सादर केलेली आर्थिक निवेदने यांचा समावेश होतो.

### लेखा परिक्षकांची जबाबदारी -

आमच्या लेखा परिक्षणांच्या आधारे त्यावर मत प्रगट करण्याची जबाबदारी आमची आहे. कायद्यातील तरतुदी आणि नियमांखालील बाबी, लेखा परिक्षणाचे मापदंड, अशा लेखापरिक्षणात समाविष्ट योग्य बाबी आम्ही विचारात घेतल्या आहेत.

कायद्याच्या कलम १४३(१०)ने निश्चित केलेल्या लेखापरिक्षण मानकदंडानुसार आम्ही आमचे लेखा परिक्षण सादर केले आहे. या मानकदंडाच्या अपेक्षेनुरुप आम्ही नैतिक जबाबदारी स्विकारून आर्थिक पत्रके व माहिती मध्ये कोणतीही चुकीची विधाने केलेली नाहीत याची जरूर ती खात्री करून लेखा परिक्षण करणे गरजेचे आहे.

आर्थिक निवेदनांमध्ये उघड केलेल्या गोष्टी आणि रकमा या विषयी योग्यती चाचणी व पुरावे तपासणे याचा समावेश लेखा परिक्षणात होतो. लेखा परिक्षकांनी निवडलेली पध्दतही त्यांच्या निर्णयशक्तीवर अवलंबून असून त्यामध्ये आर्थिक अहवाल चुकीने किंवा लबाडीने तयार केला आहे किंवा कसे याच्या मूल्यमापनाचा अंतर्भाव होतो. या जोखीमपूर्ण मूल्यमापनात कंपनीच्या अंतर्गत नियंत्रण पध्दतीनुसार तयार केलेले आर्थिक निवेदन परिस्थितीनुरुप व योग्य पध्दतीने केले आहे काय हे लेखापरिक्षक विचारात घेतात. या लेखा परिक्षणात मंडळाच्या संचालकांनी सादर केलेल्या सर्व आर्थिक पत्रकांचे मूल्यांकन योग्य आहे याची खात्री केली जाते.

आम्हाला विश्वास वाटतो की, या आर्थिक निवेदनात आम्हाला देण्यात आलेली माहिती व खुलासे मत व्यक्त करण्यास पुरेसे व योग्य आहेत.

### मत -

१) दि. ३१ मार्च २०१६ पर्यंतच्या महामंडळाच्या व्यावहारिक स्थिती आणि त्याचा नफा/तोटा व वर्षअखेरीच्या त्याच

तारखेपर्यंत रोकड ओघी (Cash Flow) नुसार

आमच्या मते आणि आमच्या समजुतीप्रमाणे आणि आम्हास देण्यात आलेल्या खुलाशानुसार सदर आर्थिक ताळेबंद व आर्थिक पत्रके व इतर माहिती कायद्यानुरुप व सत्य परिस्थिती व्यक्त करीत असून सर्वसाधारण भारतीय लेखा परिक्षण मानकदंडाप्रमाणे आहे.

## इतर कायदेशीर व नियामक बाबींची जरूरी –

१. कंपनी (ऑडिटर्स रिपोर्ट) ऑर्डर २०१६ (''द ऑर्डर'')च्या आवश्यकतेनुसार भारत सरकारने जारी केलेल्या कायदा कलम १४३च्या उपकलम (११) अनुसार परिशिष्ट अ मधील मुद्दा क्र. ३ व ४ मध्येनमूद केल्याप्रमाणे आम्ही स्पष्टीकरण देत आहोत.

२. कायदा कलम १४३(३) जरूरीनुसार आम्ही अहवाल देत आहोत.

अ) आमच्या माहिती व समजुतीप्रमाणे आम्ही हिशोब तपासणीसाठी जरूरती सर्व माहिती व स्पष्टीकरण शोधपूर्वक मिळविले आहे.

ब) आमच्या मते आम्ही हिशोबांच्या पुस्तकांची जी तपासणी केली त्यावरून कायद्यानुसार आवश्यक असलेली पुस्तके कंपनीने ठेवली आहेत.

क) या अहवालात विचारात घेतलेले ताळेबंद, नफा–तोटा पत्रक आणि रोखीचा ओघ टिपण हिशेबांच्या पुस्तकांशी मिळते – जुळते आहेत.

ड) आमच्या मते ताळेबंद, नफा–तोटा पत्रक आणि रोखीचा ओघ टिपण कंपनी कायदा २०१४ च्या कलम १३३, नियम ७ नुसार दिलेल्या मानकानुसार स्विकारार्ह आहेत.

इ) कंपनी कायदा कलम १६४(२) नुसार कोणीही संचालक ३१ मार्च २०१६ रोजी संचालक म्हणून नेमण्यास अपात्र नसल्याबद्दलचे योग्य ते प्रमाणपत्र संचालकांकडून प्राप्त झाले आहे व संचालक मंडळाने त्याची नोंद घेतली आहे.

फ) (कंपनी नियम) आर्थिक अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रण आणि त्याच्या अंमलबजावणीतील कार्यक्षमता या संदर्भात आमचे वेगळे जोडपत्रक (Annexture बी) पहावे.

ग) कंपनी नियम (ऑडिट व ऑडिटर्स), २०१४ च्या नियम ११ नुसार लेखापरिक्षकांच्या अहवालात समाविष्ट करावयाच्या इतर बाबींचा मान ठेवून आमच्या मते आणि आम्हास मिळालेल्या माहितीनुसार व आम्हास देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार –

१) कंपनीच्या आर्थिक व्यवस्थेवर परिणाम होईल असे कोणतेही अनिर्णित खटले (कंपनी संदर्भात) नाहीत.

२) मंडळाने भविष्यात विशेष तोटे येतील असे कोणतेही दीर्घ मुदतीचे किंवा साधित व्यवहार केलेले नाहीत.

३) कंपनीच्या गुंतवणूकदारांचे शिक्षण व संरक्षण निधीमध्ये वर्ग करण्यात गरज होती अशा कुठल्याही रकमा नाहीत.

**मे. पी. एन. फडके आणि कं.**
चार्टर्ड अकौंटन्टस
साठी व करिता
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्ल्यू.

**श्री. व्ही.पी. फडके**
भागिदार
सभासद नं. १००८११

स्थळ : पुणे
दिनांक : ३ सप्टेंबर, २०१६

मे. पी. एन. फडके आणि कं.
चार्टर्ड अकौंटन्टस
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्ल्यू.

१०३, मेघ अपार्टमेंटस, स. नं. ३९/३३,
आयुर्वेद रसशाळेजवळ, ऑफ कर्वे रोड,
पुणे - ४११ ००४.
ईमेल : pnphadkeca@gmail.com

## परिशिष्ट ''अे'' - स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल

कंपनीच्या ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वर्षाच्या आर्थिक ताळेबंदासंबंधीचा
कायदेशीर व नियामक बाबींचा अहवाल (परिच्छेद) १ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे)

१. अ) कंपनीने संख्यात्मक बारकाव्यांसहसंपूर्ण तपशील देणाऱ्या नोंदी योग्यप्रकारे ठेवल्याआहेत. यात स्थिर मालमत्तेच्यास्थितीची नोंदही आहे.

ब) चालू वर्षात व्यवस्थापनाने स्थिर मालमत्तेची वस्तुनिष्ठ पडताळणी केली आहे. पुस्तकातील नोंदी व वस्तुनिष्ठ पडताळणी यामध्ये कोणतीही दृष्य तफावत आढळलेली नाही. कंपनीचा एकूण व्यापआणि व्यवहारलक्षात घेता पडताळणीची वारंवारीता माफक आहे.

२. कंपनी ही सेवा देणारी संस्था आहे त्यामुळे कंपनीकडे वस्तुनिष्ठ, सविस्तर यादी किंवा सूची नाही.

३. कंपनी कायदा कलम १८९ मधील रजिस्टरमध्ये निर्देशीत केलेल्या कंपन्यांना किंवा इतर कोणत्याही पक्षकारांस (पार्टीज) तारणाची किंवा बिनतारणाची कर्जे मंजूर केलेली नाहीत. सबब ''द ऑर्डर'' मधील परिच्छेद ३(३) कंपनीस लागू नाही.

४. आम्हांस मिळालेल्या माहितीनुसार, आमच्या मते कर्जे, गुंतवणूक कर्ज हमी व सुरक्षितता याबाबत २०१३ चा कायदा कलम १८५ व १८६ नुसार कंपनीने कार्यवाही केलेली आहे.

५. कंपनी कायदा २०१५ शी निगडीत कोणत्याही तरतुदी आणि नियमांच्या चौकटीत राहून कलम ७३ ते ७६ तात्पर्यानुसार कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्विकारल्या नाहीत. त्यामुळे कंपनी नियम २०१५ प्रमाणे तरतुदी कंपनीस लागू नाहीत.

६. आम्हांस मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीच्या कोणत्याही उत्पादन वा सेवेकरिता ''द मेंटेनन्स ऑफ कॉस्ट रेकॉर्डस'' संबंधी कंपनी कायदा कलम १४८ अंतर्गत भारत सरकारने कोणतेही नियम घालून दिलेले नाहीत.

७. अ) आम्हास मिळालेल्या माहिती आणि स्पष्टिकरणानुसार आणि आम्ही तपासलेल्या कंपनीच्या नोंदीनुसार आमच्या मते कंपनी (सर्वसाधारणपणे) वाद नसलेली, कायदेशीर देयक (मार्च २०१६) भरण्यात नियमित आहे. ज्यामध्ये भविष्य निर्वाह निधी, आयकर, विक्रीकर, संपत्तीकर, व्यवसाय कर व अन्य कायदेशीर देयकांचे देय बाकी नाही.

८. आमचे मते व मिळालेल्या माहितीनुसार बँकेस देय असलेल्या रकमेसंबंधात कंपनी दोषी नाही. (default) कंपनीने सरकारकडून किंवा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थाकडून कर्ज घेतलेले नाही किंवा कर्जरोखे काढलेले नाहीत.

९. ताळेबंदाची पद्धत आणि व्यवस्थापकीय माहिती व स्पष्टिकरणानुसार कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी

स्वीकारल्या नाहीत. त्यामुळे कलम ३ (९) प्रमाणे त्या तरतूदी कंपनीस लागू होत नाहीत. सबब त्यासंबंधी काहीही उल्लेख केलेला नाही.

१०. कंपनीची पुस्तके व नोंदी तपासणी दरम्यान, आम्हांस मिळालेल्या माहिती व खुलयाशाप्रमाणे वर्षभरांत कंपनीने अथवा कंपनीमध्ये कोणतीही भ्रष्टाचाराची घटना आमचे निदर्शनास आली नाही किंवा व्यवस्थापनाने तशी माहिती दिलेली नाही.

११. ताळेबंद पद्धतीनुसार आणि व्यवस्थापनेकडून मिळालेल्या माहिती व स्पष्टिकरणाप्रमाणे कंपनी कायदा भाग १९७ शेड्यूल (५) खाली संचालकांचा मेहनताना दिलेला आहे. (योग्य त्या मान्यतेप्रमाणे त्याची व्यवस्था केली आहे.)

१२. आमच्या मतानुसार, आपली कंपनी ही निधी कंपनी (संस्था) नाही. त्यामुळे कलम ४ (१२) च्या तरतूदी लागू होत नाहीत.

१३. आमच्या मताप्रमाणे, लागू होणाऱ्या हिशोब मानांकनाप्रमाणे संबंधित पक्षकारांबरोबर झालेले सर्व व्यवहार (भाग १७७ व १८८ कंपनी कायदा २०१३ अनुरूप) आर्थिक नोंदीमध्ये दाखवले आहेत.

१४. ताळेबंद पद्धतीनुसार व आम्हांस मिळालेली माहिती व स्पष्टिकरणाप्रमाणे, या वर्षामध्ये कंपनीने सवलतीने समभाग दिलेले नाहीत किंवा रूपांतरीत कर्जरोख्यांचा पूर्ण अथवा अंशत: व्यवहार केलेला नाही. त्यामुळे या ठिकाणी त्याचा उल्लेख नाही.

१५. ताळेबंद पद्धतीनुसार व मिळालेली माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, संचालक किंवा त्यांच्या संबंधित व्यक्तींशी (non Cash) विनारोखीचा व्यवहार केलेला नाही. त्यामुळे भाग ३ (१५) च्या तरतुदी लागू नाहीत. म्हणून त्याचा येथे उल्लेख केलेला नाही.

१६. आमचे मतानुसार, भाग ४५ आयए (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा १९३४) प्रमाणे कंपनीच्या नोंदणीची आवश्यकता नाही. म्हणून येथे त्याचा उल्लेख केलेला नाही.

**मे. पी. एन. फडके आणि कं.**
चार्टर्ड अकौंटन्टस
साठी व करिता
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्ल्यू.

**श्री. व्ही.पी. फडके**
भागिदार
सभासद नं. १००८११

स्थळ : पुणे
दिनांक : ३ सप्टेंबर, २०१६

मे. पी. एन. फडके आणि कं.
चार्टर्ड अकौंटन्टस
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्लयू.

# लेखा परिक्षकांचा स्वतंत्र अहवाल (परिशिष्ट बी)

आर्थिक बाबींच्या नोंदीचा अहवाल (पश्चिम महाराष्ट्र विकास महा. मर्या.) अंतर्गत आर्थिक बाबींवरील बंधने – भाग (१) उपभाग (३) कंपनी कायदा २०१३ (द ॲक्ट) चा सेक्शन १४३ नुसार अहवाल.
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळच्या आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक बंधने आम्ही तपासली (३१ मार्च, २०१६ची) तसेच आर्थिक नोंदणी बाबीबद्दलचा ताळेबंदही पाहिला.

आर्थिक बाबींच्या नोंदीबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :–
चार्टर्ड अकौंटन्स् ऑफ इंडियाच्या अंतर्गत आर्थिक बंधनाबाबतच्या मार्गदर्शक तत्वानुसार आर्थिक अहवालावर अंतर्गत आर्थिक बंधने घालण्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन जबाबदार आहे. या जबाबदाऱ्यामध्ये एकूण व्यवसाय शिस्तबद्ध कार्यक्षमतेने चालणे, व्यवस्था, कार्यवाही, पुरेशा अंतर्गत आर्थिक बाबींवरील बंधनाची अंमलबजावणी तसेच कंपनीच्या निष्ठेनुसार कंपनीची स्थावर मालमत्ता सुरक्षित ठेवणे, भ्रष्टाचार आणि घोटाळे याला अटकाव करणे व शोध घेणे, हिशोबात अचूकपणा, पूर्णता आणणे इ. (कंपनी कायदा २०१३ नुसार) गोष्टींचा समावेश होतो.

लेखा परिक्षकांची जबाबदारी : –
आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे त्यावर मत प्रकट करणे आमचे काम आहे. कायदा कलम १४३ (१०) २०१३ नुसार आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक बंधनावरील हिशोबतपासणीची मार्गदर्शक तत्वे लक्षात घेऊन आम्ही हिशोब तपासणी केलेली आहे. ही तपासणी अंतर्गत आर्थिक बंधने व इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटन्स्चा अहवाल – दोन्हीस लागू होते. आम्ही नैतिक गरजेअनुरुप तपासणी काम करावे, तसेच आर्थिक अहवाला– वर अंतर्गत आर्थिक बंधनाबाबत योग्य खात्री करुन घेणे ही मानांकन आणि मार्गदर्शक तत्वांची अपेक्षा आहे.
आर्थिक निवेदनांमध्ये उघड केलेल्या गोष्टींबद्दल योग्यती चाचणी व पुरावे तपासणे याचा समावेश लेखा परिक्षणात होतो. परिक्षकांनी निवडलेली पद्धत ही त्यांच्या निर्णयशक्तीवर अवलंबून असून त्यामध्ये आर्थिक अहवाल चुकीचे तयार केला आहे किंवा कसा याच्या मूल्यमापनाचा अंतर्भाव होतो. या जोखीमपूर्ण मुल्यमापनात कंपनीच्या अंतर्गत नियंत्रण पद्धतीनुसार तयार केलेले आर्थिक टीपण परिस्थितीनुसार व योग्य पद्धतीने केले आहे का? हे लेखापरिक्षक विचारात घेतात.
कंपनीच्या अंतर्गत आर्थिक निर्बंध व्यवस्थेबाबत विचार करता, आम्हास मिळालेली माहिती पूर्ण आणि योग्य असून पडताळणी अहवालास आधारभूत आहे असा आम्हास विश्वास वाटतो.

आर्थिक वृत्तांताबाबत आर्थिक निर्बंध (अंतर्गत) आकलन :–
आर्थिक वृत्तांतावरील कंपनीचे अंतर्गत निर्बंध ही एक व्यवस्था आहे. ज्या योगे व्यवहारात मान्य अशा हिशोब नियमानुसार बाह्य कारणासाठी आर्थिक नोंदी तयार करणे व आर्थिक वृत्तांताबाबत खातरजमा करणे शक्य होते.
कंपनी आर्थिक वृत्तांतावर, कंपनीच्या आर्थिक अंतर्गत निर्बंधामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. १) जुने दप्तर संभाळणे, ज्याद्वारे कंपनीचा व्यवहार व स्थावर मालमत्तेविषयी योग्य अशा बारकाव्यानिशी माहिती मिळते. २) मान्यताप्राप्त हिशोब नियमांनुसार, आर्थिक नोंदीकरिता आवश्यक सर्व व्यवहारांची नोंद योग्य तऱ्हेने झाली आहे, अशी खात्री देणे तसेच कंपनीचा खर्च व येणारे पैसे यांचे संचालक मंडळ आणि संचालय यांचे अधिकाराने नियोजन होत आहे याची खात्री देणे, गैर मार्गाने अथवा चुकीच्या पद्धतीने कंपनीच्या मालमत्तेचा वापर, विक्री

अथवा ताबा घेणे इत्यादीबाबत योग्यती माहिती देणे. ज्यामुळे कंपनीच्या अर्थकारणावर विपरित परिणाम होऊ शकतो.

आर्थिक अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रणाच्या मूळच्या (Inherent) मर्यादा :-

आर्थिक अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रणाच्या मर्यादा असल्याने, अयोग्य प्रकारचे व्यवस्थापन, नियंत्रणावर अतिक्रमण, गैरव्यवस्था अथवा भ्रष्टाचार होऊ शकेल व निदर्शनास येणे शक्य होणार नाही. आर्थिक अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रण हे भविष्यातील सादरीकरणामुळे धोकादायक होऊ शकते. जुळवून घेण्याच्या प्रक्रिया खालावू शकते.

मत :

आमचे मते आर्थिक अहवालावर अतंर्गत आर्थिक नियंत्रण करण्याबाबत कंपनी कार्यक्षमपणे काम करीत आहे. (३१ मार्च, २०१६) ही बाब ३/९/२०१६ आर्थिक अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रण परिमाण (Criteria) नुसार कंपनीने अंमलात आणली आहे. तसेच ऑडिट ऑफ इन्टरनल फायनानशियल कंट्रोल्स् (गायडन्स नोट) प्रमाणेही कंपनी कार्यरत आहे. (इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटन्टसयांनी जारी केलेले)

मे. पी. एन. फडके आणि कंपनीच्या वतीने व साठी.

**में. पी. एन. फडके आणि कं.**
चार्टर्ड अकौंटन्टस
च्यावतीने व साठी
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्ल्यू.

**श्री. व्ही.पी. फडके**
भागिदार
सभासद नं. १००८११

स्थळ : पुणे
दिनांक : ३ सप्टेंबर, २०१६

# पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (मर्या.)

## ३१ मार्च, २०१६ चा ताळेबंद

| | तपशील | टिपणी क्र. | ३१.३.२०१६ अखेर रु. लाखांत | ३१.३.२०१५ रु. लाखांत |
|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ |
| I | निधी आणि जबाबदारी | | | |
| १) | भागधारकांचा निधी | | | |
| | अ) भाग भांडवल | ३ | ३०५.७७ | ३०५.७७ |
| | ब) राखीव निधी व शिल्लक | ४ | १७०५.८८ | (२५७.१८) |
| २) | विलंबीत जबाबदाऱ्या | | | |
| | अ) दीर्घ मुदतीचे येणे | ५ | २६५०.८५ | २६५०.८५ |
| | ब) विलंबित कर जबाबदारी (निव्वळ) | ६ | १३.७० | १४.२९ |
| | क) इतर दीर्घ मुदतीच्या जबाबदारी | ७ | ५६१०.७० | ५३९९.१८ |
| | ड) दीर्घ मुदतीच्या तरतुदी | ८ | ३.९६ | ४.९० |
| ३) | चालू देणी | | | |
| | अ) व्यापारीदेणे | ९ | ९.२८ | ४९.९६ |
| | ब) इतर चालू देणे | १० | ५६.७० | ९.६६ |
| | क) लघु मुदतीच्या तरतुदी | ११ | ४६.७६ | ४०.०२ |
| | एकूण | | १०४०३.६० | ८२१७.४५ |
| II | मालमत्ता | | | |
| १) | अप्रचलित मालमत्ता (नॉनकरंट ॲसेटस) | | | |
| | अ) स्थिर मालमत्ता | १२ | | |
| | i) खरी मालमत्ता | | ८६.७६ | ९१.८२ |
| | ii) अनाकलनीय मालमत्ता | | २.६८ | ३.१० |
| | ब) अप्रचलित गुंतवणूका | १३ | २७.० | २७.२२ |
| | क) दीर्घ मुदतीची कर्जे व अग्रिमे | १४ | १३९५.६६ | १४४३.४८ |
| | इ) इतर अप्रचलीत मालमत्ता | १५ | ५५४.२५ | ४५५.१६ |
| २) | चालू मालमत्ता | | | |
| | अ) चालू गुंतवणूका | | – | – |
| | ब) व्यापारीयेणे | | – | – |
| | क) रोकड व त्यासमान | १६ | ८०३५.९९ | ५९२८.०५ |
| | ड) लघु मुदतीची कर्जे व अग्रिमे | १७ | १२७.९९ | २१४.४१ |
| | इ) इतर चालू मालमत्ता | १८ | १७३.२७ | ५४.२१ |
| | एकूण | | १०४०३.६० | ८२१७.४५ |

हिशेबांच्या धोरणांचा महत्त्वपूर्ण सारांश – १-२.
इतर टीपा – २६-२४
सोबत दिलेल्या गेलेल्या टीपा या आर्थिक निवेदनांच्या आवश्यक भाग आहेत.
येणेप्रमाणे आमचा या तारखेचा अहवाल

**मे. पी. एन. फडके आणि कं.**
चार्टर्ड अकौंटन्टस
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्लयू.

**श्री. व्ही.पी. फडके**
भागिदार
सभासद नं. १००८११
स्थळ : पुणे, दिनांक : ३ सप्टेंबर, २०१६

संचालक मंडळासाठी व त्यांचे वतीने
**प. म. वि. महा. मर्या.**

| सदाशिव सुरवसे | विक्रम कुमार | संजय देगांवकर |
|---|---|---|
| व्यवस्थापकीय संचालक | संचालक | संचालक |

| अभिनंदन मोरे | काशिनाथ डेकाटे |
|---|---|
| संचालक | संचालक |

# पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (मर्या.)

## (३१ मार्च, २०१६ अखेर) वर्षाचे नफा – तोटा पत्रक

| अनु. क्र. | तपशील | टिपणी नं | ३१.३.२०१६ अखेर रु. लाखांत | ३१.३.२०१५ अखेर रु. लाखांत |
|---|---|---|---|---|
| १) | आर्थिक व्यवहारातूनमिळालेला महसूल | १९ | १८५.४९ | ८३.५७ |
| २) | इतर उत्पन्न | २० | २४२९.७७ | १२३७.९९ |
| ३) | एकूण महसूल (१+२) | | २६१५.२६ | १३२१.५६ |
| ४) | खर्च : | | | |
| | कामगार लाभ खर्च | २१ | ४४३.७८ | ४२४.९८ |
| | आर्थिक किंमत | २२ | ४०.९२ | ४०.५१ |
| | घसारा व अमोर्टायझेशन खर्च | १२ | ६.६० | ७.२७ |
| | इतर व्यवस्थापकीयव विक्री खर्च | २३ | ८२.२३ | १०६.०३ |
| | सामुदयिक सामाजिक जबाबदारी | | ०.२९ | – |
| ५) | एकूण खर्च | | ५७३.८२ | ५७८.७९ |
| ६) | अपवादात्मकव असाधारण बाबी व कर पूर्व नफा (३–५) | | २०४१.४४ | ७४२.७७ |
| ७) | गतवर्षातील गोष्टी | २४ | (०.०६) | –३.०२ |
| ८) | कर पूर्व नफा/(तोटा) (६–७) | | २०४१.५० | ७३९.७५ |
| ९) | करांचा खर्च | | | |
| | १) चालू कर | ६ | ४३.११ | – |
| | २) विलंबीत कर | | ०.५९ | १.१७ |
| | | | ४२.५२ | १.१७ |
| १०) | कालावधीतील नफा/(तोटा) (८ + ९) | | १९९८.९८ | ७४०.९२ |
| ११) | निव्वळनफा | | १९९८.९८ | ७४०.९२ |
| १२) | प्रत्येकन्यायहक समभाग मिळकत | | | |
| | (प्रत्येकशेअरची दर्शनी किंमत रु. १००/-) | २५ | | |
| | १) मूलभूत | | ६५३.७६ | २४२.३२ |
| | २) सौम्य | | ६५३.७६ | २४२.३२ |

हिशेबांच्या धोरणांचा महत्त्वपूर्ण सारांश – १–२.
इतर टीपा – २६–२४
सोबत दिल्या गेलेल्या टीपा या आर्थिक निवेदनांच्या आवश्यक भाग आहेत.
येणेप्रमाणे आमचा या तारखेचा अहवाल

**मे. पी. एन. फडके आणि कं.**
चार्टर्ड अकौंटन्टस
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्ल्यू.

**श्री. व्ही.पी. फडके**
भागिदार
सभासद नं. १००८११
स्थळ : पुणे, दिनांक : ३ सप्टेंबर, २०१६

संचालक मंडळासाठी व त्यांचे वतीने
**प. म. वि. महा. मर्या.**

**सदाशिव सुरवसे** – व्यवस्थापकीय संचालक
**विक्रम कुमार** – संचालक
**संजय देगांवकर** – संचालक
**अभिनंदन मोरे** – संचालक
**काशिनाथ डेकाटे** – संचालक

# पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (मर्या.)

## ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता रोखीचा ओघ (Cash Flow) दाखविणारी टीप

रुपये लाखात

| क्र. | तपशील | ३१ मार्च २०१६ वर्ष अखेर | | ३१ मार्च २०१५ वर्ष अखेर | |
|---|---|---|---|---|---|
| | | रु. लाखात | रु. लाखात | रु. लाखात | रु. लाखात |
| अ) | चालू उद्योगातील रोखीचा ओघ | | | | |
| | कर पूर्व नफा | २०४१.४४ | | ७४२.७७ | |
| | करिता जुळवणी | | | | |
| | घसारा | ६.६० | | ७.२७ | |
| | मागील काळातील खर्च | | | २.८२ | |
| | लाभांश मिळकत | १८५१.४३ | | ७७१.४३ | |
| | व्याजावरीलखर्च | ४०.९२ | | ४०.५१ | |
| | भांडवल बदला पूर्वीचा कार्यरत नफा | | २३७.५३ | | १६.३० |
| | जुळवणी करीता | | | | |
| | लघु मुदतीचे कर्ज व उचल यांमधील वाढ/उतार | ८६.४३ | | (५.९५) | |
| | इतर चालू मालमत्तेतीलवाढ/उतार | (११९.०६) | | (१९.००) | |
| | दीर्घ मुदतीचे कर्ज व उचल यांमधील वाढ/उतार | ४७.८२ | | ११.३९ | |
| | इतर वापरात नसलेल्यामालमत्तेतीलचढ/उतार | (९९.०९) | | (२२.१२) | |
| | इतर अप्रचलित गुंतवणूक | ०.२२ | | -- | |
| | व्यवसायातीलदेण्यांमधील वाढ/उतार | (४०.६८) | | ४७.५५ | |
| | लघु मुदतीच्यातरतुदीतील चढ/उतार | ६.७४ | | (१४.४०) | |
| | दिर्घ मुदतीच्यातरतुदीतील चढ/उतार | (०.९४) | | -- | |
| | इतर दीर्घ मुदतीच्याजबाबदाऱ्यांतील चढ/उतार | २११.५२ | | १५७.२४ | |
| | इतर चालू जबाबदारी वाढ/उतार | ४७.०४ | | (२.८२) | १८९.८९ |
| | चालू उद्योगातून मिळालेली रोकड | | १४०.० | | २०६.१९ |
| | भरलेले कर | | ४३.११ | | – |
| | चालू उद्योगातून मिळालेली (वापरलेली) निव्वळरोकड | | ३३४.४२ | | २०६.१९ |
| ब) | भांडवली कार्यातील रोखीचा ओघ | | | | |
| | स्थिर मालमत्ताखरेदी | | १.१२ | | (२.४०) |
| | स्थिर मालमत्ताविक्री | – | – | – | – |
| | भांडवली उद्योगातून मिळालेली निव्वळरोकड | | १.१२ | | (२.४०) |
| क) | आर्थिक कार्यातील रोखीचा ओघ | | | | |
| | भरलेले व्याज | | (४०.९२) | | (४०.५१) |
| | लाभांश मिळकत | | १८५१.४३ | | ७७१.४३ |
| | लाभांश वाटप | | (३०.५८) | | – |
| | लाभांश वाटपावरील कर | | (५.२९) | | – |
| | आर्थिक कार्यातून मिळालेली रोकड (निव्वळ) | | १७७४.६४ | | ७३०.९२ |
| | निव्वळरोकड | | | | |
| | किंवा त्यासमान (अ + ब + क) | २१०७.९४ | | ९३४.७१ | |
| | रोकड – सुरुवातीची शिल्लक व त्यासमान | ५९२८.०५ | | ४९९३.३४ | |
| | बंद करताना रोख शिल्लक व त्यासमान | ८०३५.९९ | | ५९२८.०५ | |
| | रोकड व त्यासमान अंतर्भाव असलेले | | | | |
| | बँकेकडील शिल्लक | | २९९.४५ | | २९९.८४ |
| | बँकेकडील ठेवी (१२ महिने मुदत) | | ७७३३.४८ | | ५६२७.९० |
| | हातातील रोकड | | ३.०६ | | ०.३१ |
| | | | ८०३५.९९ | | ५९२८.०५ |

टीपा :

१. वरील रोखीचा ओघ निवेदन हे हिशोबतपासणी मानक ३(अे एस ३) कॅशफ्लो स्टेटमेंट मधील ''इनडायरेक्ट मेथड'' नुसार तयार केले आहे.

२. रोखीचा ओघ निवेदनातील रोकड व रोकड समान यामध्ये बँकेतील रोकड हाती असलेली रोकड आणि ३ महिने किंवा कमी मुदतीच्या लघुमुदत गुंतवणुकीचा समावेश होतो.

३. कंसात दिलेले आकडे बाहेर जाणारा रोखीचा ओघ दर्शवितो.

याप्रमाणे आमचा अहवाल :

**मे. पी. एन. फडके आणि कं.**
चार्टर्ड अकौंटन्टस
फर्म रजिस्ट्रेशन नं. : १०७८९० डब्लयू.

**श्री. व्ही.पी. फडके**
भागिदार
सभासद नं. १००८११
स्थळ : पुणे, दिनांक : ३ सप्टेंबर, २०१६

संचालक मंडळासाठी व त्यांचे वतीने
**प. म. वि. महा. मर्या.**

**सदाशिव सुरवसे** — व्यवस्थापकीय संचालक
**विक्रम कुमार** — संचालक
**संजय देगांवकर** — संचालक
**अभिनंदन मोरे** — संचालक
**काशिनाथ डेकाटे** — संचालक

# पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (मर्या.)

## ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाच्या आर्थिक निवेदनासोबत जोडलेल्या टिपा :

१. व्यवसायाचे स्वरूप :

पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (मर्या.) हा शासनाचा अंगिकृत व्यवसाय आहे. फ्रॅंकींग करणे व पॅनकार्ड विकणे, मळी (मोले सेस) ची तपासणी इत्यादी व्यवसायात गुंतवलेला आहे.

२. महत्त्वाची लेखा धोरणे :

अे) आर्थिक निवेदने तयार करण्याचा आधार :

